देशोन्नती




उप व्यवस्थापकीय संचालक अरविंद कुमार सिंह यांचे आवाहन

स्टेट बँक शाखा समुद्रपूरतर्फे वित्तीय समावेशन शिबिराचे आयोजन

# आज स्टेट बँक आपल्या दारी ,तेव्हा बँकेच्या विविध योजनांचा घ्या फायदा

देशोन्नती वृत्तसंकलन

**समुद्रपूर :** ग्राहकांना विविध कामासाठी बँकेत यावं लागत होते. आज परिस्थिती बदलली बँकेच्या विविध योजनांची माहिती घेऊन बँक आपल्या दारी संकल्पना सुरू झाली तेव्हा भारतीय स्टेट बँकच्या ज्या योजना आहे त्या योजनांचा लाभ नागरिकांनी घेणे काळाची गरज झाली आहे. असे मत भारतीय स्टेट बँक शाखा समुद्रपूरचे वतीने आयोजित वित्तीय समावेशन शिबिरात उपव्यवस्थापकीय संचालक अरविंदकुमार सिंग यांनी व्यक्त केले. भारतीय स्टेट बँक समुद्रपूरचे वतीने दिपाली कम्प्लेक्स समुद्रपूर येथे वित्तीय समावेशन शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये अध्यक्षस्थानी स्टेट बँकेचे उपव्यवस्थापकीय संचालक मुंबई अरविंदकुमार सिंग होते. तर प्रमुख अतिथी म्हणून प्रशासकीय कार्यालय नागपूरचे उपव्यवस्थापक राजीव सौरव, विभागीय कार्यालय वर्धाचे विभागिय व्यवस्थापक सुधीर कुमार, आरबीआयचे विभागीय संचालक सचिन शेंडे, आरबीआय उपजनरल मॅनेजर अंजना सोमनाथ, आरबीआयचे एजिएम विनोदकुमार, जिला अग्रणी बँकचे चेतन शिरभाते, शाखा व्यवस्थापक विशाल धनविजय उपस्थित होते. शिबिरात काही कर्ज वाटप सुद्धा केले तर पीएमजेडीवाय अंतर्गत खाते उघडणे त्याचप्रमाणें निष्क्रिय असलेले खाते ते सक्रिय करणे त्याचप्रमाणे रूपे कार्ड वितरण करणे व सक्रिय करणे ,पीएमजेजेबिवाय व पीएमएसबीवाय विमा नोंदणी करणे, अटल पेन्शन योजना नोंदणी करणे,किसान क्रेडिट कार्ड व स्वयं-सहायता गट जोडणी करणे, डिजिटल बँकिंग,मोबाईल बँकिंग कशी करणे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. शासनाच्या विविध योजनाचा लाभ घेण्याबाबत सुद्धा मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी आरबीआयच्या उप जनरल मॅनेजर अंजना सोमनाथ यांनी १० वर्ष जुने खाते चालू करून सुव्यवस्थित चालू ठेवण्याबाबत आव्हान केले. यावेळी डेस्क ऑफिसर सदाशिव कालेवाड, जोती कुमार अमृता गुहा,नितीन ढवळे, पदमाकर धकाते उपस्थित होते. कार्यक्रमात विविध योजनांची माहिती चेतन शिरभाते यांनी दिली. प्रास्ताविक राजीव सौरभ यांनी केले. संचालन अमृता गुहा व प्रीती चव्हाण यांनी केले. आभार सुधीर कुमार , शाखा व्यवस्थापक विशाल धनविजय यांनी मानले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी निशांत दुपारे , सुबोध गजभिए , प्रकाश मोघे, किरण गजभिए यांनी सहकार्य केले.

**तालुका प्रतिनिधी**

## शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याबाबत मार्गदर्शन

शिबिरात काही कर्ज वाटप करण्यात आले. तर पीएमजेडीवाय अंतर्गत खाते उघडणे , त्याचप्रमाणें निष्क्रिय असलेले खाते ते सक्रिय करणे ,रूपे कार्ड वितरण करणे व सक्रिय करणे ,पीएमजेजेबिवाय व पीएमएसबीवाय विमा नोंदणी करणे, अटल पेन्शन योजना नोंदणी करणे, किसान क्रेडिट कार्ड व स्वयं-सहायता गट जोडणी करणे, डिजिटल बँकिंग,मोबाईल बँकिंग कशी करणे. यासह शासनाच्या विविध योजनाचा लाभ घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.